| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा १८/२०२२**<br>**शलमोन डेव्हीड काळे**<br>**वि.**<br>**सुनिल शामराव गायकवाड** |

## नि.२४ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी याने दाखल केलेल्या कागदपत्रांना निशाणी देण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे सन्माननिय वकिल यांनी युक्तिवाद केला की, वादी याने दाखल केलेली कागदपत्रे ही सार्वजनिक कागदपत्रे असून त्या वादी याने सदर कागदपत्रे नि. ३, नि. ५ व नि. १३ येथे हजर केलेली आहेत. सदर दाखल कागदपत्रामध्ये सर्वे क्रमांकचे सातबारा उतारे, एकत्रिकरण तक्ता, फेरफार उतारे, गट क्रमांकाचे सातबारा उतारे आणि दावा मिळकत खरेदीपत्र दाखल केलेले आहे. मुळातच सदर कागदपत्रे ही दावा मिळकतीबाबत गुणदोषावर निर्णय होणेकरिता अत्यंत आवश्यक आहेत. सदरची कागदपत्रे दाखल करून घेवून त्यास निशाणी देवून पुराव्यामध्ये ग्राहय धरण्याकरिता आदेश होणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर कागदपत्रांना निशाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदर कागदपत्रांना निशाणी देण्यात यावी अशी विनंती केली.

४. प्रतिवादी तर्फे सन्माननिय वकिल यांनी असा युक्तिवाद केला की, मुळातच सार्वजनिक दस्तऐवजांना निशाणी देण्यास त्यांची हरकत नाही. मात्र जी कागदपत्रे वादी यांनी स्वतःच्या कब्जातून हजर केलेली आहेत. त्याबाबत वादी यांनी पुरावा दाखल करणे गरजचे आहे. तसेच सदर कागदपत्रे ही वैयक्तिक कागदपत्रे असल्यामुळे त्यांना शाबीत झाल्याशिवाय निशाणी देता येणार नाही. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकिल यांनी वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. वादी यांनी नि. ३ सोबत खरेदीपत्र झेरॉक्स कॉपी, फेरफार उतारा क्र. ६७६४ झेरॉक्स कॉपी, फेरफार क्र. २९१५ झेरॉक्स कॉपी, गट क्र. ६७६, गट क्र. ६७६,गट क्र. १६०, गट क्र. १८० या सातबारा उताऱ्यांच्या झेरॉक्स कॉपी व गट क्र.६७६ ऑनलाईन कॉपी आहेत. सदर कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता, सदर कागदपत्रे ही झेरॉक्स दिसून येत आहेत. त्यामुळे भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदीनुसार झेरॉक्स प्रतींना निशाणी देता येणार नाही असे वाटते.

७. वादी यांनी नि. ५ येथे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाबाबत मे. न्यायालयाने आदेश पारीत केलेला आहे.

८. वादी यांनी नि. १३ येथे एकत्रिकरण तक्ता स्टेटमेंट, सुमित्रराव कृष्णाजी काळे यांच्या नावचा एकत्र कुटुंब उतारा सहीसूद नक्कल, सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी, कोल्हापूर यांचे कडील एकत्रिकरण तक्ता झेरॉक्स प्रत,गट क्र. ६७६ चा सातबारा उतारा ऑनलाईन प्रत, गट क्र. ६८६/१ चा सातबारा उतारा सहीसूद नक्कल, गट क्र. ६८६/२ चा सातबारा उतारा सहीसूद नक्कल ही कागदपत्रे हजर केलेली आहेत. सदर कागदपत्रांमध्ये संबंधित कार्यालयाकडून घेण्यात आलेल्या सहीसूद नक्कला या सार्वजनिक दस्तऐवज आहेत. त्यामुळे सदर कागदपत्रांना भारतीय पुरावा कायद्यानुसार निशाण देणे योग्य होईल असे वाटते. मात्र इतर कागदपत्रे ही झेरॉक्स प्रती व ऑनलाईन प्रती असल्यामुळे त्यांना निशाणी देता येणार नाही.

९. वरील सर्व कारणमिमांसेचा विचार करता वादी यांनी नि. १३ येथे जोडलेल्या सार्वजनिक दस्तऐवजांच्या सहीसूद नक्कलांना निशाण देणे योग्य होईल असे वाटते. सबब मी

पुढील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

**१. वादी यांचा नि. २४ वरील अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.**

**२. वादी यांनी नि. १३ येथे दाखल केलेल्या सहीसूद नक्कलांना नि. २५, २६ व २७ देण्यात येत आहे.**

सही/-

दिनांक १३/११/२०२५

**के. दि. काकतकर**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.